# पोलीस शिपाई भरती -२०१९

## पोलीस आयुक्त पुणे शहर

महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम, २०११ व त्यामध्ये शासनाने वेळोवेळी आणि दिनांक १८/१/२०१९ व दिनांक ४/७/२०१९ च्या आदेशान्वये केलेल्या सुधारित तरतुदीनुसार पोलीस आयुक्त पुणे शहर यांचे आस्थापनेवरील पोलीस शिपाई यांची रिक्त असलेली पदे भरण्यासाठी आवेदनपत्र संगणकीय प्रणालीव्दारे भरण्यात येणार आहेत. ह्या बद्दलची सविस्तर माहिती www.mahapariksha.gov.in व www.punepolice.co.in व www.punepolice.gov.in व www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उमेदवारांच्या माहितीकरिता प्रसिध्द करण्यात आली आहे.

- उमेदवारास (१) जिल्हा पोलीस दलातील पोलीस आयुक्त/ पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील जिल्हा पोलीस शिपाई, (२) जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या आस्थापनेवरील जिल्हा पोलीस बॅन्डस्मन, (३) लोहमार्ग पोलीस दलातील लोहमार्ग पोलीस शिपाई व (४) कारागृह विभागातील कारागृह शिपाई अशा विविध पदांसाठी ऑनलाईन आवेदन अर्ज सादर करता येईल. प्रत्येक पदाच्या अर्जासाठी स्वतंत्र परिक्षा शुल्क आकारण्यात येईल. जिल्हा पोलीस शिपाई, जिल्हा पोलीस बॅन्डस्मन, लोहमार्ग पोलीस शिपाई व कारागृह शिपाई पदासाठी उमेदवारांना ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावा लागेल. ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करण्याची सुविधा www.mahapariksha.gov.in या पोर्टलवर उपलब्ध राहणार आहे.

- जिल्हा पोलीस शिपाई/लोहमार्ग पोलीस शिपाई व कारागृह पोलीस शिपाई या पदांच्या आवेदन अर्जासाठी उमेदवारांची एकच लेखी परिक्षा महापरिक्षा पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने प्रथम घेण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे जिल्हा पोलीस बॅन्डस्मन पदांच्या आवेदन अर्जासाठी उमेदवारांची एकच लेखी परिक्षा महापरिक्षा पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने प्रथम घेण्यात येणार आहे. शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे शारिरीक मोजमाप व शारिरीक चाचणी उमेदवाराने अर्ज भरलेल्या पोलीस घटकांमार्फत घेण्यात येईल. दोन घटकांतील शारिरीक चाचणीच्या तारखा एकाच दिवशी आल्यास त्याची जबाबदारी या कार्यालयाची राहणार नाही व त्यामध्ये बदल करता येणार नाही. एकाच पोलीस घटकांतील एकाच पदासाठी दोन अर्ज करण्यास मुभा नाही. असे आढळल्यास संबंधीत उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.

- उमेदवारांनी आवेदन अर्जात अचूक माहिती द्यावी. चुकीची माहिती दिल्यास, उमेदवारी कोणत्याही टप्प्यावर रद्द होईल. उमेदवारांची लेखी परिक्षा व शारिरीक चाचणीनंतर ज्या उमेदवारांची निवड होईल त्यांचीच सर्व मुळ कागदपत्रे तपासण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांकडे योग्य कागदपत्रे नसतील तर तो अपात्र होईल. केवळ लेखी परिक्षा व शारिरीक चाचणीव्दारे निवड झाली म्हणून तो पात्र ठरणार नाही.

- **भरती प्रक्रियेमध्ये प्रथम लेखी परिक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात येणार आहे.** त्यानंतर गुणत्तेनुसार **शारिरीक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची शारिरीक चाचणी घेण्यात येईल.** लेखी परिक्षा व शारिरीक चाचणीत प्राप्त झालेल्या एकूण गुणांच्या गुणवत्तेनुसार तात्पुरती निवडसुची तयार करण्यात येईल

Scanned by CamScanner

तात्पुरत्या निवडसुचीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांचीच मूळ कागदपत्रे पडताळणी करण्यात येतील. कागदपत्र पडताळणीत पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निवडसूचीमध्ये समावेश केला जाईल. निवड यादीतील उमेदवारांची निवड तात्पुरती (Provisional selection) असेल. निवड यादीमध्ये उमेदवाराच्या नावाचा समावेश झाला म्हणून नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येवू नये.

- पदोन्नतीवरील आरक्षणासंदर्भात शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्रमांक २८३०६/२०१७ बाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या आदेशाच्या अधिन राहून व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७५/२०१८ व इतर संलग्न याचिकांमध्ये दिनांक २७/६/२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या याचिकेबाबत होणा-या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून रिक्त पदांची गणना केलेली आहे. त्यामुळे जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या रिक्त पदांच्या संख्येमध्ये बदल होऊ शकतो व त्याची माहिती वेळोवेळी संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. त्यानुसार नियुक्ती अधिकारी यांना पदे भरण्याचा अधिकार आहे.

- शासनाने लागू केलेले खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकांसाठी लागू केलेले आरक्षण हे या अनुषंगाने उद्‌भवणा-या न्यायालयीन प्रकरणांतील अंतिम निर्णयाच्या अधिन असेल.

- जाहिरातीतील नमुद केलेल्या रिक्त पदांची एकूण संख्या/ पूर्ण पदे भरणेबाबत शासन आदेशाच्या अधिन असेल. पद संख्या कमी झाल्यास उमेदवारास निवडीबाबत कोणताही दावा करण्याचा हक्क राहणार नाही.

- जिल्हा पोलीस शिपाई/जिल्हा पोलीस बॅन्डस्मन / लोहमार्ग पोलीस शिपाई व कारागृह विभागातील कारागृह शिपाई पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता, आवश्यक असलेली प्रमाणपत्रे/ कागदपत्रे, सामाजिक व समांतर आरक्षणाबाबतची माहिती, परीक्षा शुल्क, आवेदन अर्ज सादर करण्याबाबतची माहिती, अर्ज सादर करण्याचा दिनांक व वेळ आणि उमेदवारांसाठी सविस्तर सूचना www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर दिलेल्या सविस्तर जाहिरातीमध्ये उपलब्ध आहेत. **सदरहू जाहिरात काळजीपूर्वक वाचून, समजून घेऊन व रिक्त पदांबाबतची खातरजमा करुन उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने आवेदन अर्ज सादर करावेत.**

दिनांक- /८/२०१९

3/8.

(डॉ.संजय शिंदे)
पोलीस भरती प्रमुख तथा
अपर पोलीस आयुक्त, प्रशासन पुणे शहर

Scanned by CamScanner